# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.
तार - EDUTECH E-mail : desk10@dte org.in Internet : www.dte.org.in


क्रमांक : १०/एआयसीटीई/पदविका/मान्यता/२००९/४८०
दिनांक :

प्रति,
प्राचार्य,
मातोश्री एज्युकेशन सासायटीचे,
मातोश्री इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी,
पो. धानोरे, ता. येवला,
जि. नाशिक ४२३३०३.

२६ AUG 2009

[D 5110]

विषय : **शैक्षणिक वर्ष २००९-२०१० पासून अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रम राबविण्यास नवीन संस्थेस मान्यता देण्याबाबत..**

संदर्भ :१) शासन निर्णय क्रमांक : मान्यता-२००९/(३०४/०९)/तांशि-५, दिनांक ३० जुन, २००९.
२) या कार्यालयाचे पत्र क्र. १०/एनजीपी/पदविका/ २००९/ २७६/८, दिनांक. १७जुलै, २००९.

उपरोक्त विषयासंदर्भात आपणांस कळविण्यांत येते की, शासनाने संदर्भाधीन क्रमांक-१ च्या शासन निर्णयान्वये आपल्या संस्थेस शैक्षणिक वर्ष २००९-२०१० पासून खालील पदविका अभ्यासक्रमाची नवीन संस्था त्यांच्यासमोर दर्शविलेल्या प्रवेशक्षमतेसह सुरु करण्यास विहीत अटींच्या अधिन राहून परवानगी दिलेली आहे.

| अ.क्र. | अभ्यासक्रम | प्रवेशक्षमता |
|---|---|---|
| १. | सिव्हील इंजिनिअरींग CE | ६० |
| २. | कॉम्प्युटर इंजिनिअरींग CO | ६० |
| ३. | इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी IF | ६० |
| ४. | मेकॅनिकल इजिनिअरींग ME | ६० |
| ५. | इलेक्ट्रॉनिक्स ॲण्ड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरींग EJ | ६० |

शासनाने दिलेल्या परवानगीस अनुसरुन वरील पदविका संस्थेसाठी अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेची नियत ठेव म्हणून संचालक, तंत्रशिक्षण मुंबई व अध्यक्ष, मातोश्री एज्युकेशन सासायटी, नाशिक यांच्या संयुक्त खात्यात भारतीय स्टेट बँक, शाखा येवला, नाशिक येथे रुपये १५.०० लाख पावती क्रमांक ०४६०५८८ दिनांक २९.०५.२००९, अन्वये ८ वर्ष मुदतीसाठी नियतठेव म्हणून भरलेले आहेत. तसेच वरील अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षासाठी संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई व अध्यक्ष, मातोश्री एज्युकेशन सासायटी, नाशिक यांच्या संयुक्त खात्यात भारतीय स्टेट बँक, शाखा येवला, नाशिक येथे रुपये ६.०० लाख पावती क्रमांक ०४६०६८१ दिनांक २४.०८.२००९, अन्वये ५ वर्ष मुदतीसाठी नियतठेव म्हणून भरलेले आहेत. तसेच वरील अभ्यासक्रमाचे नोंदणी शुल्क रु. ३०,०००/- फक्त (रुपये तीस हजार फक्त) संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुबंई यांच्या नावे भारतीय स्टेट बँक, शाखा येवला, नाशिक येथे अनुक्रमे पावती क्रमांक ८६९०१६ दिनांक १८.०८.२००९ अन्वये धनाकर्ष स्वरुपात जमा केले आहेत. वरील अभ्यासक्रमाच्या द्वितीय वर्षासाठी रुपये ५.०० लाख इतक्या रकमेची ५ वर्षासाठी नियतठेव भरण्यात यावी. सदर शासन निर्णयात नमूद केलेल्या अटींचे पालन करण्याचे नोंदणीकृत हमीपत्र रुपये १००/- च्या स्टॅम्प पेपरवर या संचालनालयास सादर केलेले आहे.

विहित केलेल्या अटींपैकी उरलेल्या खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून उपरोक्त नमूद केलेले अभ्यासक्रम सन २००९-२०१० पासून विना अनुदान तत्वावर सुरु करण्यास व विद्यार्थ्यास प्रवेश देण्यास या संचालनालयाकडून अंतिम परवानगी देण्यांत येत आहे.

१. सदर मंजूरी कायम विना अनुदान तत्वावर राहील.

२. सदर अभ्यासक्रमासाठी संस्थेची प्रवेशक्षमता उपरोक्त तक्त्यामध्ये नमूद केल्याप्रमाणे मर्यादित राहील.

३. शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग क्रमांक : टिइएम ३३८२/१११८३६/(१९०)/तांशि-१(अ), दिनांक २१ मे १९८३ अन्वये विना अनुदान तंत्रशिक्षण संस्थांना परवानगी देण्यासाठी शासनाने विहित केलेल्या अटी व शर्ती संस्थेस बंधनकारक असतील.

४. संस्थेने अभ्यासक्रम चालविण्यास पूर्णवेळ शिक्षकवृंद व इतर तांत्रिक कर्मचारी नेमावे व शासन नियमाप्रमाणे वेतन व भत्ते कर्मचाऱ्यांना देण्यांत यावे. तसेच शिक्षकवृंद व इतर कर्मचाऱ्यांच्या वेतन व भत्ते इत्यादीबाबत तसेच विद्यार्थ्यांकडून या संचालनालयाकडे तक्रारी आल्यास संस्थेवर कडक कारवाई करण्यात येईल.

५. आपल्या संस्थेला महाराष्ट्र शासन, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई व महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, बांद्रा, मुंबई यांचेकडून वेळोवेळी विहित करण्यांत आलेले प्रवेश नियम, आरक्षण, शिक्षणशुल्क व इतर शुल्क या संबंधीच्या निर्णयाचे पालन करणे बंधनकारक राहील.

६. संस्थेतील ग्रंथालयास आवश्यक ती पुस्तके, नियतकालिके महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, बांद्रा, मुंबई यांच्या मानकानुसार खरेदी करणे आवश्यक आहे. तसेच विद्यार्थ्यांना वाचनालयाचा पुरेपूर उपयोग होण्याचे दृष्टीने ग्रंथालयात विद्यार्थ्यांना अभ्यासिकेची सोय करणे आवश्यक आहे.

७. संचालक किंवा या संचालनालयाने प्रतिनिधी यांना अखिल भारतीय तंत्रशिक्षण परीषद / महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ / शासनाच्या मानकाप्रमाणे जागा, इमारत, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व इतर सोयीसुविधा उपलब्ध आहेत किंवा कसे याबाबतची तपासणी करण्याचा अधिकार संचालनालयास राहील.

८. शासन किंवा या संचालनालयाने किंवा महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, बांद्रा, मुंबई यांनी प्राधिकृत करण्यांत आलेले अधिकारी यांस संस्थेचे निरिक्षण करुन त्या निरीक्षणांती संस्थेस आढळून येणाऱ्या उणीवांबद्दल उचित कार्यवाही करण्याचे अधिकार राहतील.

९. सदर संस्था संचालक, तंत्रशिक्षण यांच्या नियंत्रणाखाली राहिल व संबंधित अभ्यासक्रमांच्या परीक्षा महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, बांद्रा, मुंबई, यांच्याकडून घेतल्या जातील.

१०. संस्थेला महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, बांद्रा, मुंबई, यांची सदर अभ्यासक्रमासाठी संलग्नता घ्यावी लागेल.

११. विद्यार्थ्यांना प्रवेश देतांना त्यांच्याकडून रकमेच्या स्वरुपात कॅपिटेशन फी किंवा इतर कोणत्याही स्वरुपात देणगी स्विकारता येणार नाही तसेच प्रवेश गुणवत्तेनुसार करणे बंधनकारक आहे.

१२. शासनाने, या संचालनालयाने, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, बांद्रा, मुंबई, यांनी वेळोवेळी ठरवून दिलेल्या अटी व शर्तीचे संस्था उल्लंघन करीत असल्यास सदरची संस्था बंद करण्याचे अधिकार अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या शिफारशीनुसार शासनास राहतील.

( डॉ. सु. का. महाजन )
प्र. संचालक
तंत्रशिक्षण महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी सादर:-
१. मा. सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई.
२. सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, नाशिक.
३. उपसचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, विभागीय कार्यालय, औरंगाबाद.
४. कार्यासन क्रमांक २-अ व ३, मुख्य कार्यालय, मुंबई.
५. निवड नस्ती.

11. Consequent to the Supreme Court Judgment the Model constitution of Governing Body as notified by AICTE in it's approval Regulations 1994, stands overruled. "It has been Decided that while AICTE will not insist of any nomination in the Governing Body of Private unaided institutions, the Affiliating body/ state Government Shall impose minimum condition of affiliation, such as prescription of qualification of Government Body Members, in order to ensure academic excellence. The condition so imposed will be subject to scrutiny by AICTE, Wherever necessary, to ensure that the same are not unreasonable restrictions".

12. "It shall be desirable for the private unaided institutions to induct at 50% of members of the Governing body drawn from renowned academic , academic administrators, subject field experts and 4 professionals from industry in order to seek their innovative ideas for Continuous improvement in the delivery of teaching, learning process, making best Practice elsewhere and achieve excellences".

In the event of infringement/ contravention or non- compliance of the above conditions and /or the provision of AICTE Act & Regulations/ Guidelines / Norms & Standards as prescribed by AICTE, further actions leading to "Reduced Intake" or "No Admission" or "Withdrawal of Approval", may be taken by AICTE and the liability arising out of such actions will be solely that of the Management of the Institution.

The Council reserves the rights to visit the Institution any time it may deem fit to verify the compliance of norms and standards of AICTE.

**THE DECISION OF GRANT OF APPROVAL IS SUBJECT TO FINAL DECISION OF SLP NO.12368/09 IN PLI 80/09 AND SLP 26162-26164/08 IN WP 6188/08**

Yours Faithfully

(DR. SANJAY SHARMA)
**DIRECTOR**

**Copy to:** 1) THE ADVISER [ E&T], AICTE, NEW DELHI – 110 001.

2) THE DIRECTOR OF TECHNICAL EDUCATION, MAHARASHTRA STATE, 3, MAHAPALIKA MARG, DHOBI TALAO, MUMBAI – 400 001.

3) THE SECRETARY, THE BOARD OF TECHNICAL EDUCATION, MAHARASHTRA STATE, 49, KHERWADI ALI YAVAR JUNG MARG, GOVT. POLYTECHNIC CAMPUS, BANDRA (EAST), MUMBAI – 400 051. ( HE IS REQUESTED TO COMPLETE THE PROCESS OF AFFILIATION FOR FACILITATING ADMISSION.)

4) THE PRINCIPAL, **MATOSHRI EDUCATION SOCIETY, MATOSHRI INSTITUTE OF TECHNOLOGY, DHANORE, TAL-YEOLA, DIST-NASHIK**

5). GUARD FILE.